# शाळापूर्व तयारी – उपचारात्मक ब्रीज कोर्स (15 ते 30 जून)

## मागील इयत्तेच्या अध्ययन निष्पत्तीवर आधारित अभ्यासक्रम समाविष्ट

टेस्ट सोडवा

### आम्ही जाहिरात वाचतो

या मुलांनो या रे या, लवकर सारे नाटक पाहा !
धमाल विनोदी बालनाट्य — माशाचं घोरणं पाहायला विसरू नका.

**चौकस चिंगी आणि घोरणारा मासा**

उद्या शनिवार दिनांक : २२ एप्रिल
दुपारी : ३.३० वाजता
स्थळ – रंगकला नाट्यगृह, रेणापूर



लेखक – योगेश डिखळे
दिग्दर्शक – रजनी चिपलकट्टी
निर्माती – लता वानखेडे
कलाकार – २२ तडाखेबाज बालकलाकार आणि घोरणारा मासा.

तिकीटविक्री नाट्यगृहावर रात्री ८ वाजेपर्यंत.
आजच तिकीट खरेदी करा. दर रुपये ५०/–,३०/–

प्रत्येक तिकिटावर एक चिवडा–पाकीट चक्क मोफत !

**रेणापूरच्या वर्तमानपत्रात आलेली ही जाहिरात पाहा. काळजीपूर्वक वाचा व उत्तरे लिहा.**

### स्वाध्याय

प्र. १. जाहिरात कशाची आहे ?

प्र. २. बालनाट्याचे नाव काय आहे ? बालनाट्य कोणत्या दिवशी आहे ?

प्र. ३. या नाटकाचे दिग्दर्शन कोणी केले आहे ?

प्र. ४. नाटक कोणासाठी आहे ? ते कशावरून कळते ?

प्र. ५. ज्या दिवशी वर्तमानपत्रात जाहिरात आली, त्या दिवशी कोणता वार व तारीख असेल ? ते कशावरून कळते ?

प्र. ६. आजच तिकीट खरेदी करा, असे जाहिरातीत कशामुळे सांगितले असेल ? उद्या तिकीट खरेदी केले तर चालेल का ?

प्र. ७. सुमी तिकीट घ्यायला गेली. तिकीट देताना तिथले काका म्हणाले, ''येताना टोप्या घालून या.'' त्यांनी टोप्या घालून यायला का सांगितले असेल ?

प्र. ८. प्रत्येक तिकिटावर चिवडा–पाकीट मोफत मिळणार आहे. तुम्हांला चिवडा आवडतो का ? चिवड्याऐवजी काय मिळालेले तुम्हांला जास्त आवडेल ?

## खालील गुणाकार करा.

टेस्ट सोडवा

### गुणाकारासाठी पाढ्यांचा उपयोग

- चिंटूने वाढदिवसासाठी एक पेन ५ रुपयांस याप्रमाणे ६ पेनं घेतली, तर त्याला दुकानदाराला एकूण किती रुपये द्यावे लागतील ?

→ एकूण किंमत माहीत करून घेण्यासाठी ५ चा पाढा, पाच साहे पर्यंत म्हणावा लागेल.
पाच साहे तीस म्हणजेच ५ × ६ = ३०
एकूण ३० रुपये द्यावे लागतील.

| | |
|---|---|
| ६ | पेनं |
| × ५ | एका पेनची किंमत |
| ३० | एकूण रुपये |

- एका रांगेत ८ झाडे, अशा ५ रांगांत किती झाडे ?

→ रांगा ५, प्रत्येक रांगेत झाडे ८.
करायची क्रिया : गुणाकार. ८ चा पाढा वापरू.
आठ पाचे चाळीस
एकूण झाडे = ४०

| | |
|---|---|
| ५ | रांगा |
| × ८ | प्रत्येक रांगेतील झाडे |
| ४० | एकूण झाडे |

- एका डब्यात ९ लाडू. अशा ७ डब्यांत किती लाडू मावतील ?

करायची क्रिया : गुणाकार
९ चा पाढा म्हणू.
नऊ साते ______

| | |
|---|---|
| ७ | डबे |
| × ९ | एका डब्यातील लाडू |
| ______ | एकूण लाडू |

- एका सप्ताहात ७ दिवस, तर ४ सप्ताहांत किती दिवस ?

→ ७ चा पाढा म्हणू.
सात चोक ______

| | |
|---|---|
| ४ | सप्ताह |
| × ७ | एका सप्ताहातील दिवस |
| ______ | एकूण दिवस |

- एका ओळीत ८ फरश्या, तर ३ ओळींत किती फरश्या ?

| | |
|---|---|
| ८ | एका ओळीतील फरश्या |
| × ३ | ओळी |
| ______ | एकूण फरश्या |

| | |
|---|---|
| ३ | ओळी |
| × ८ | एका ओळीतील फरश्या |
| ______ | एकूण फरश्या |

- एका पेरूची किंमत ६ रुपये आहे. टोनी, सोनी, नंदू व सलमा या चौघांना प्रत्येकी एक पेरू देण्यासाठी किती रुपये लागतील ?

| | |
|---|---|
| ६ | एका पेरूची किंमत |
| × ४ | मुले |
| ______ | एकूण रुपये |

टेस्ट सोडवा

## Practice the following table.

**Using tables for multiplication**

- On his birthday, Chintu bought 6 pens at ₹ 5 per pen. How much must he pay the shopkeeper for them ?

→ To find out the total cost, we must say the 5 times table up to 5 sixes.

5 sixes are thirty, that is 5 × 6 = 30

So Chintu must pay ₹ 30 altogether.

| | | |
|---|---|---|
| | 6 | Pens |
| × | 5 | Cost of one pen |
| | 30 | Total cost |

- How many trees in 5 rows if there are 8 trees in one row ?

→ Rows 5, trees in each row 8

Operation : Multiplication

We shall use the 8 times table.

Eight fives are forty .

Total trees = 40.

| | | |
|---|---|---|
| | 5 | Rows |
| × | 8 | Trees in each row |
| | 40 | Total number of trees |

- If 9 laddoos can be put in one box, how many can be put in 7 such boxes ?

Operation : Multiplication

We shall say the 9 times table.

Nine sevens are ______

| | | |
|---|---|---|
| | 7 | Boxes |
| × | 9 | Laddoos in one box |
| | | Total number of laddoos |

- 7 days in one week, so how many days in 4 weeks ?

→ Say the 7 times table.

Seven fours ______

| | | |
|---|---|---|
| | 4 | Weeks |
| × | 7 | Days in one week |
| | | Total days |

- 8 tiles in one row, how many in 3 rows ?

| | | |
|---|---|---|
| | 8 | Tiles in a row |
| × | 3 | Rows |
| | | Total number of tiles |

| | | |
|---|---|---|
| | 3 | Rows |
| × | 8 | Tiles in a row |
| | | Total number of tiles |

- One guava costs ₹ 6.
How much money will be needed to buy one guava for each of the four friends Tony, Sonu, Nandu and Salma ?

| | | |
|---|---|---|
| | 6 | Cost of one guava |
| × | 4 | Number of children |
| | | Rupees in all |

**h-l-r-s**

1. **Name the pictures in each strip in English. All the words in each strip begin with the same sound. Say the sound. Circle the letter that shows the sound.**
प्रत्येक पट्टीतील चित्रांची इंग्रजी नावे सांगा. प्रत्येक पट्टीतील शब्द एकाच ध्वनीने सुरू होतात. तो ओळखा. त्याच्या अक्षराभोवती गोल करा.




टेस्ट सोडवा



h s l r



h s l r



h s l r



h s l r

2. **Spot the letter in the words. Join the same letters.**
दिलेले अक्षर शब्दांत शोधा. ती अक्षरे जोडा.



| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| h | hat | horn | behave | handle | house |
| l | lock | wall | plough | police | lion |
| r | rose | are | bird | frog | brother |
| s | sun | sister | glass | basket | biscuits |

वाचा व दिलेल्या प्रश्नांची उत्तरे वहीत लिहा.

टेस्ट सोडवा

**सांगा पाहू**

पण हे पाणी कुठून येत असावे?

या प्रश्नाचे उत्तर आहे – '**पाऊस**'. आपल्याला सर्व पाणी पावसापासून मिळते.


पाऊस

- पाऊस पडल्यावर त्याचे काही पाणी जमिनीवरून वाहते. त्यामुळे ओहोळ, ओढे, नद्या तयार झाल्या आहेत.
- पावसाचे काही पाणी खोलगट भागात साचते. त्यापासून तलाव तयार झाले आहेत.
- नदीचे वाहणारे पाणी भिंत बांधून अडवले जाते, त्याला धरण म्हणतात. पाऊस नसतो तेव्हा धरणाचे पाणी वापरता येते.
- पावसाचे काही पाणी जमिनीत मुरते. हे पाणी काढण्यासाठी विहीर खणली जाते. हातपंप किंवा कूपनलिका वापरूनही हे पाणी काढले जाते.
- जमिनीतील पाणी काही ठिकाणी झऱ्यांमधूनही बाहेर पडते.

पाणी मिळण्याची काही ठिकाणे निसर्गात आपोआप तयार होतात. धरण व विहीर यांसारखी ठिकाणे मात्र माणसाने तयार केली आहेत. पाऊस कमी पडला, तर या ठिकाणांचे पाणी कमी होते. तुमच्या परिसरात, तालुक्यात किंवा जिल्ह्यात पाण्याची ठिकाणे तुम्ही पाहू शकता. सोबतचा जिल्हा नकाशा अभ्यासा व त्यावरील कृती पूर्ण करा.

**नदी कशी तयार होते व वाहते?**

- पावसाचे पाणी डोंगरासारख्या उंच भागावरसुद्धा पडते. ते उताराच्या दिशेने वाहते.
- अशा पाण्याचे असंख्य ओहोळ एकत्र येऊन नदी तयार होते.
- नदी, डोंगर, दऱ्या, पठार व मैदान यांवरून वाहते.

**जलरूपे :** पाण्याचे प्रवाह व साठे ही जलरूपांची उदाहरणे आहेत. झरा, ओढा, नदी, तळे, जलाशय, खाडी, समुद्र, महासागर ही काही जलरूपे आहेत.

**भूरूपे :** उंचवटा व खोलगटपणा यामुळे जमिनीला वेगवेगळे आकार मिळतात. पर्वत, शिखर, डोंगर, टेकड्या, पठारे, मैदाने, खिंड, दरी ही काही भूरूपे आहेत.

**माहीत आहे का तुम्हांला : झरा कोठून येतो ?**

पावसाचे पाणी जमिनीत मुरते. जमिनीवरील मातीच्या व दगडांच्या भेगांतून ते खोलवर झिरपते. जमिनीखालीसुद्धा ते उंच भागाकडून कमी उंचीच्या भागाकडे वाहते. हे जमिनीखालचे पाणी काही ठिकाणी जमिनीतून बाहेर पडते. यालाच आपण 'झरा' म्हणतो.





| माझा ऑनलाईन अभ्यास – प्रत्येक घटकाच्या टेस्ट सोडवा खालील लिंकवरून | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| चौथी मराठी | चौथी गणित | सेमी गणित | चौथी इंग्रजी | चौथी प.अ-1 | चौथी प.अ-2 |
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

| दररोजच्या माझा अभ्यास pdf तुम्हाला खालील लिंकवर मिळतील. | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

| इतर इयत्तांच्या ऑनलाईन टेस्ट सोडवा खालील लिंकवरुन... | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

निर्मिती - श्री.प्रविण डाकरे, श्री.जयदिप डाकरे
वेब स्रोत-'ई-बालभारती'
सौजन्य- जिल्हा परिषद कोल्हापूर
https://www.gurumauli.in